नि.फौ.ख.क्रं.६७/२०२२.
सरकार वि. प्रभाकर.
**नि.क्रं.३१.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५ यांची जबानी.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की–

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | अंकुश शंकरलाल सोनगडे, |
| वय सुमारे | : | ३५ वर्ष, व्यवसाय– शेती, |
| निवासस्थान | : | ग्राम बकेरा, |
| तालुका | : | वाराशिवनी, जिल्हा: बालाघाट (म.प्र) |

**सरतपास — सहा. सरकारी वकील श्रीमती आर. व्ही. रामटेके मॅडम यांचेमार्फत–**

१. फिर्यादी ही माझी पत्नी आहे. मी पवनी येथे सन २०२१–२०२२ मध्ये पुर्णा या कंपनीमध्ये काम करत होतो. घटना ही दिनांक ०६ मार्च, २०२२ रोजी घडली. त्यावेळी मी कंपनीमध्ये ०९.३० वाजता सकाळी काम करण्याकरीता गेलो होतो. दुपारी ०४.०० वाजता मला पत्नीचा फोन आला व माझी पत्नी मला "रडत रडत'' सांगत होती की, ''मला या दुकानामध्ये काम करायचे नाही''. माझी पत्नी कान्हा साडी सेंटर येथे काम करीत होती. ती आरोपीच्या मालकीचे दुकान होते. घटना ही आरोपीच्या दुकानामध्ये घडली होती.

२. मला माझ्या पत्नीचा ०४.०० वाजता फोन आला व तीने मला "रडत रडत'' सांगीतले की, "मला दुकानात काम करायचे नाही''. त्यावर मी तिला म्हटले की, "का करायचे नाही?''. मी तिला म्हटले की, "दुकान मालकाने काही म्हटले का?'' तीने म्हटले की, "बोला नही, किया''.

३. त्यानंतर मी कंपनीवरून घटनास्थळावर गेलो. त्यावेळी ०४.०० ते ०४.३० वाजले होते. माझी पत्नी दुकानामध्ये शांत बसली होती. मी तिला विचारले की, काय झाले ? तर ती रडत होती. तीने काहीही सांगीतले नाही. त्यानंतर मी तिला घरी घेवुन गेलो. त्यानंतर मी तिला विचारले की, काय झाले? तर तीने मला सांगीतले की, "दुपारी ०२.०० वाजता दुकानामध्ये ग्राहक नव्हते. मी आणि दुकान मालक बसलो होतो''. त्यावेळी दुकान मालकाने म्हटले की, "निचे के गलीचे उप्पर के रूम मे रखनॉ''. त्यानंतर तिने सांगीतले की, ती त्याच्या सांगण्याप्रमाणे ते गलीचे घेवुन वरती गेली आणि तेथील सामान हटवुन जागा केली. त्यानंतर आरोपी दुकान मालक तिच्या मागे मागे आला. त्याने म्हटले की, "इथे बसं'', तर माझ्या पत्नीने म्हटले की, "इथे बसुन काय करायचे?'', तर आरोपीने तिला म्हटले की, "तु मुझे अच्छी लगती है! त्यानंतर आरोपीने तिचे दोन्ही हात पकडुन तिच्या ओठाचे चुंबन घेतले व छातीवरून हात फिरवत होता. त्यानंतर तिने खाली उतरण्याचा प्रयत्न केला, तर आरोपीने तिला म्हटले की, ''तुझ्या पतीला तुझ्यापासुन मुलं पाहिजे, तर मी तुझे पाय भारी

करतो'', (मी तुला गर्भवती करतो) "तुझ्या पतीला मुलं पाहिजे आणि सासु सास–याला नातवंड खेळायला पाहिजे'', असे आरोपीने तिला म्हटले. त्यानंतर माझी पत्नी जागा करून खाली उतरली.

४. त्यानंतर माझ्या पत्नीने मला फोन केला. त्यानंतर मी माझ्या पत्नीला घेवुन पोलीस ठाण्याला गेलो आणि आरोपी प्रभाकर मोहाडीकर यांच्या विरूध्द फिर्याद दिली. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. पोलीसांनी माझे बयान घेतले होते. पोलीस दुकानामध्ये आले होते. त्यांनी फोटो वगैरे काढले होते.

**सरतपास संपला.**

**उलट तपास आरोपीतर्फे वकील कुमारी के. व्ही. शेंडे मॅडम यांनी उलटतपास तहकुब करण्याचा अर्ज दाखल केला. तो मंजूर करण्यात आला. त्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

समक्ष
Sd/–
(अ. वि. पंडित)
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी.
०८/०१/२०२६

श्रवणोत्तर स्विकृत
Sd/–
(अ. वि. पंडित)
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी.
०८/०१/२०२६